# शिवतीर्थावरून..! भाग २





## दादरचे 'बेडेकर सदन' एक ऐतिहासिक वास्तू व तेथील उत्साही ‘तरुण मित्र मंडळ’

मागे म्हटल्याप्रमाणे, शिवाजी पार्क हे असं तीर्थक्षेत्र आहे की, तेथे पावलोपावली पुण्य पदरी पडतं. मुंबईच्या प्रत्येक भेटीत निदान मला त्याचा अनुभव हमखास येतो. एक दिवस ‘शिवतीर्थावरून’ फेरी मारतांना माझा नातलग (आत्येभावाचा मुलगा) प्रफुल्ल व त्याची पत्नी भाग्यश्री कळके भेटली आणि मला खालील उद्‌बोधक, महत्वपूर्वक व स्मरणरंजनात्मक माहिती मिळाली. अगदी दुर्मिळ छायाचित्रांसहित. त्यांचा व भाग्यश्रीचे काका श्री. शशिकांत ठाकूरदेसाई यांचा मी अत्यंत आभारी आहे.






*१-२) दादरच्या प्लाझा सिनेमासमोरील गिरगांव पंचे डेपो... ३) त्यामागील ऐतिहासिक बेडेकर सदन इमारतीची वास्तू...*



***१) तेथील रहिवासी ८७ वर्षांचे श्री. शशिकांत ठाकूरदेसाई... २-३) बेडेकर सदन इमारतीची वास्तू व खोल्या...***






***१) तरुण मित्र मंडळ' बेडेकर सदन तर्फे दादरच्या छबिलदास शाळेत पं. कुमार गंधर्व यांचे गायन. मुंबईचे माजी महापौर सुधीर जोशी त्यांची ओळख करून देतांना... 2) संगीतकार गायक सुधीर फडके यांच्या संगीत कार्याला २५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल 'तरुण मित्र मंडळ' तर्फे त्यांच्या सत्कार समारंभात भाषण करतांना HMV चे अधिकारी व भावगीताचे प्रवर्तक जी. एन. जोशी. व्यासपीठावर बसलेले बाबूजी-सुधीर फडके व अशोकजी रानडे. स्थळ: दादरची छबिलदास शाळा... ३) ज्या शाळेत बेडेकर सदनमधील 'तरुण मित्र मंडळींनी' रसिकांसाठी अनेकोत्तम दर्जेदार कार्यक्रम करून इतिहास घडविला ती छबिलदास मुलांची शाळा...***


भाग्यश्री कळके ही पूर्वाश्रमीची ठाकूरदेसाई. तिचे काका शशिकांत ठाकूरदेसाई व आजोबा सावळाराम सदाशिव ठाकूरदेसाई. प्लाझा सिनेमासमोर शाहाडे आठवले यांच्या पातळाच्या दुकाना नंतर असलेल्या गिरगांव पंचे डेपोमागे लोणची मसालेवाले यांनी १९३८ मध्ये 'बेडेकर सदन' च्या एकूण १०० उच्चभ्रू कुटुंबांच्या दोन इमारती बांधल्या. तेथे ही ठाकूरदेसाई मंडळी रहात होती. काका शशिकांत यांनी आज वयाची ऐशी ओलांडली असून त्यांची स्मरणशक्ती व त्यांच्या अनमोल आठवणी आजही ताज्या आहेत.

हे सर्व सामाजिक कार्य करणारे शास्त्रीय संगीताचे शौकीन. त्यामुळे त्यांनी 'तरुण मित्र मंडळ' स्थापन करून आजोबांनी सर्व प्रथम बिस्मिल्ला खान यांचा सनईचा कार्यक्रम आयोजित केला होता. तसेच, आयष्याच्या उत्तरार्ध आजोबांनी पुण्यात स्वामी विवेकानंदांच्या शिष्याकडून दीक्षाही घेतली होती. ते आध्यत्मक वृत्तीचे होते. याचा उल्लेख 'महाराष्ट्रात विवेकानंद' या पुस्तकात आहे.



*१-२-३) मुंबईचे माजी महापौर सुधीर जोशी पं. भीमसेन जोशी यांची ओळख करून देतांना. तबल्यावर वसंतराव आचरेकर. स्थळ: दादरची छबिलदास शाळा...*


बेडेकर सदनमधील कांही उत्साही मंडळीत श्री. माधवराव जोशी यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यात कोजागिरी पौर्णिमा महोत्सव, गणेशोत्सव, नाटकं व कथाकथन या उपक्रमांद्वारे बीज पेरले. त्या काळात सहली काढून घरातील बायका मंडळींना नित्याच्या गोष्टीतून हवापालट घडविली. या वातावरणात तरुण पिढींचा मोठा सहभाग होता. त्यात मुंबईचे सर्वात तरुण महापौर श्री. सुधीर जोशी हे याच बेडेकर सदन मध्ये राहणारे होते. १९६३ साली श्री. सुधीर जोशी, श्री. शशिकांत ठाकूरदेसाई व बंधू, श्री. अशोक फडणीस, श्री. मोहन सरदेसाई आणि इतरांनी अतिशय दूरदृष्टीने 'तरुण मित्र मंडळाची' स्थापना केली होती. मंडळी, या मंडळाची दर महिना वर्गणी होती फक्त रुपये एक. आणि जर कुणाला नोकरी लागली तर स्वइच्छेने त्याने दहा रुपये वर्गणी द्यायची. ही विनंती होती.



*१-२-३) पं. कुमार गंधर्व यांचे गायन. तबल्यावर वसंतराव आचरेकर. स्थळ: दादरची छबिलदास शाळा...*

या 'तरुण मित्र मंडळाचा' पहिलाच कार्यक्रम सुप्रसिद्ध गायक श्री. प्रभाकर कारेकरांच्या नाट्यसंगीताने दणक्यात झालेलं होता. त्यांना पहिली बिदागी दिली होती रुपये ५००/- त्यानंतर गायक श्री. दशरथ पुजारी यांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने छबिलदास शाळेत सादर केला होता. हे सर्व कार्यक्रम हाऊस फुल्ल झाले होते. यामुळे मंडळाचा उत्साह द्विगुणीत होत गेला. मग मंडळाची घोडदौड थांबली नाही. नंतर पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व, पं. जितेंद्र अभिषेकी, बेगम परवीन सुलताना व फैयाज अशा दिग्गज कलाकारांनी उत्तमोत्तम कार्यक्रम करून आपली उपस्थिती मंडळात गाजविली व रुजविली होती.

त्यानंतर दहा रुपये तिकिटे लाऊन दणक्यात तीन दिवसांचे संगीत महोत्सव साजरे केले गेले होते. पुढे नाट्यसंगीतांच्या कार्यक्रमात निर्मला गोगटे, वसंतराव देशपांडे, प्रभाकर कारेकर, रामदास कामत इत्यादिंनी हजेरी लाऊन आणि रसिकांना तृप्त केले होते. पं. भीमसेन जोशी यांच्या अभंगवाणीचा पहिला कार्यक्रम याच मंडळानी सादर केला होता. तो दिवस होता आषाढी एकादशीचा. तेव्हा छबिलदासचे सभागृह-गॅलऱ्या रसिकांनी खच्चून भरले होते. म्हणतात, त्यावेळी मुंगी शिरायलाही तेथे जागा नव्हती..! तसेच, पं. कुमार गंधर्व यांचा 'गीत वर्षा' हा पहिला कार्यक्रम सादर करण्याचा मानही याच मंडळांनी मिळविला होता. हे प्रशंसनीय व कौतुकास्पद होते.



***१-२-३) नेहमी तोबा गर्दीत सादर होणाऱ्या सुश्राव्य कार्यक्रमात पं. जितेंद्र अभिषेकी यांचे गायन. स्थळ: दादरची छबिलदास शाळा...***




***१-२-३) दादरच्या रानडे रोडवरील (पश्चिम) सद्रुद्दीन हाऊस. जेथे माझ्या आत्येभावाचा मुलगा प्रफुल्ल व पत्नी सौ. भाग्यश्री कळके रहातात. तसेच त्यांचा गुणी मुलगा पार्थ. ज्यांच्यामुळे मी हा लेख लिहू शकलो...***

नंतर ग. वा. बेहरे, शांताबाई शेळके व व. पु. काळे यांचे कथाकथनांचेही कार्यक्रम या मंडळांनी उत्सहाने सादर केले होते. तसेच, बाळ कोल्हटकर यांचा 'वाहतो ही दुर्वांची जुडी'चा भव्य नाट्यप्रयोग याच मंडळानी सादर करून रसिकांना मेजवानी दिली होती. येथवर न थांबून मंडळानी श्री. राम टिपणीस, श्री. सूर्यकांत जोग, श्री. अशोकजी रानडे यांच्या मौलिक मार्गदर्शनाखाली ११,०००/- रुपये खर्च करून 'गीत वर्षा' साजेसा नांवचा अंकही प्रकाशित केला होता. थोडक्यात १९६३ ते १९७० या सात वर्ष्यात मंडळानी भरपूर सांस्कृतिक कार्यक्रम करून रसिकांना मंत्रमुग्ध करून दादरमध्ये एक वेगळा ठसा उमटविला

होता. हे करतांना सहाजिक अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. अनेक कडू-गोड अनुभवांना मंडळाला नाईलाजाने सामोरे जावे लागले होते. परंतु, अनेक हृदयस्पर्शी घटनांचे मंडळ साक्षीदार झाले होते. आश्चर्य म्हणजे, नेहमीचा तबलेवाला साथीला न आल्याने परवीन सुलताना यांनी ५०/- रुपये उदार अंतःकरणानी परत केले होते. तसेच, आयत्यावेळी कार्यक्रमाला प्रसाद सावकार यांनी नकार दिल्याने रामदास कामत यांनी गायन सादर करून पैशाअभावी होणारी फजिती दूर करून मंडळाची अब्रू राखली होती. असेही किस्से आहेत.

मी अभिमानाने नमूद करतो की, भाग्यश्रीचे काका श्री. शशिकांत ठाकूरदेसाई हे BEST मध्ये (Brihanmumbai Electric Supply and Transport) काम करीत होते. नंतर मुंबईचे माजी महापौर सुधीर जोशी यांच्याबरोबर कांही वर्ष हॉटेल व्यवसायात भागीदार म्हणून काम करीत होते. प्रफुल्ल हा डाबर इंडिया या औषधी कंपनीत काम करतो. तसेच, रामकृष्ण मिशनसाठी सामाजिक कार्यही करतो. पत्नी भाग्यश्री ही बालमोहन विद्यामंदिर शाळेत ऑफिस हेड म्हणून मानाचे काम करीत होती. मुलगा पार्थ हा Sports Community Manager at a sports mobile app in Bandra, Mumbai. येथे काम करतो. He studied masters in sports management from Russian International Olympic University, Sochi, Russia.

प्रफुल्लला साहित्याची व वाचनाची प्रचंड आवड असून तो प्रकाशित होणारे प्रत्येक साहित्य विकत घेतो. त्याचा साहित्यिक संग्रह अथवा मासिकांची लायब्ररी मोठया प्रमाणात आहे. त्याचा उपयोग अनेकजण करतात. आणि तोही सर्वांना मदत करतो. माझ्या दुर्मिळ सचित्र लेखांचा तो चाहता आहे. मी घेत असलेल्या मेहनतीची त्याला जाण आहे. हल्लीचे लेखक दुसऱ्याच्या खिश्यात हात घालून वाङ्मय चौर्य करतात व स्वतःच्या प्रतिबिंबाशिवाय त्यांना कांहीही दिसत नाही असं त्याचं प्रामाणिक मत. मीही त्याला सहमत आहे. तो म्हणतो, "जयंता, आज तू अनेक वर्ष असंख्य व्यक्तिचित्रणं दुर्मिळ छयाचित्रांसह लिहीलीस व लिहितोय. अनेकवेळां मुंबईत येऊन अनेकांना भेटलास. परंतु, तुझ्यावर लेख लिहावा असं आज पर्यंत कुणाही लेखकाला अथवा पत्रकाराला वाटू नये. ही लांच्छनास्पद बाब होय." प्रफुल्लचं हे बोलकं व अनपेक्षित वक्तव्य मला खूप समाधान देऊन गेलं. माझ्या 'गुलदस्ता' पुस्तकाचा ५०० पानांचा दुसरा भाग तयार असून तो या वर्षी प्रकाशित होईल याची मी त्याला ग्वाही दिली. *'भगवानके घर देर है, अंधेर नहीं...'* दुसरं काय..? असो.

मंडळी, तो काळ, ती माणसे व ते दिवस कांही औरच होते, असे श्री. शशिकांत ठाकूरदेसाई आनंदाने डोळ्यात पाणी येऊन आवर्जून सांगतात. आज वयाच्या ८७ वर्षी वरील सर्व घटनांचे ते एकमेव साक्षीदार आहेत. त्यांची समरणशक्ती वाखाणण्यासारखी आहे. कांही कारणांनी माझ्या धांवत्या दौऱ्यात त्यांची

भेट होऊ शकली नाही याचा मला खेद वाटतो. हा ठळक गोषवारा त्यांनी मला लिहून पाठविला व त्याचबरोबर जपून ठेवलेले ऐतिहासिक दुर्मिळ छायाचित्रेंही न विसरतां दिलीत. १९७१च्या युद्धानंतर 'महागाई' या शब्दाची प्रकर्षाने ओळख झाली. याचा परिणाम मात्र या 'तरुण मित्र मंडळावर' मोठ्या प्रमाणात झाला. आता शिल्लक राहिल्या त्या या जुन्या संस्मरणीय आठवणी. त्या आपणच जपून ठेवायला हव्यात. मंडळी, मला मिळालेले हे सर्व ‘धन अनमोल' आहे. मी भाग्यवान ठरलो..!

(क्रमशः)

**- जयंत कुळकर्णी**